11 DEC 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्सच्या नवीन तुकड्यांना मान्यता

## कायमस्वरुपी विनाअनुदान तत्त्व; शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालयांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध अकरा महाविद्यालयांना कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि क्रॉप सायन्स या अभ्यासक्रमांच्या एकूण १३ नवीन तुकड्या सुरु करण्यास कायमस्वरुपी विनाअनुदान तत्त्वावर राज्य शासनाने मान्यता दिली आहे. याबाबत आदेश शासनाच्या कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने गुरुवारी (दि. ७ डिसेंबर) मंजूर केला आहे.

सद्य:स्थितीत तांत्रिक, वाणिज्य, कृषी, मत्स्य गटातील एकूण १६ द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम राबविण्यात येतात. या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या अभियांत्रिकी विद्याशाखेतील पदविकेच्या द्वितीय वर्षामध्ये प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. या अभ्यासक्रमांची वाढती मागणी लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमाच्या अधिकच्या अथवा नवीन तुकड्या कायमस्वरुपी विनाअनुदानित तत्त्वावर सुरु करण्यास इच्छुक असलेल्या संस्थांकडून प्राप्त झालेल्या अर्ज, प्रस्तावांची व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने छाननी केली. त्यातून विहीत निकष, मानकांची पूर्तता करणारे प्रस्ताव हे बारावीच्या स्तरावरील द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रमांच्या नवीन अथवा अधिकच्या तुकड्यांमध्ये कायमस्वरुपी विना अनुदान तत्त्वावर सन २०१७-१८ पासून सुरु करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाला सादर करण्यात आला. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील विविध अकरा महाविद्यालयांना कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि क्रॉप सायन्स या अभ्यासक्रमांच्या एकूण १३ नवीन तुकडयास सुरु होणार आहेत.

> “मोबाईल ॲप्स् वापरण्याकडे लोकांचा कल वाढत आहे. असे ॲप्स्, संगणक प्रणाली विकसित करण्यासाठी कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशन यांच्या एकत्रीकरणातून नवी आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम पुढे आले आहेत. त्यांच्याकडे विद्यार्थ्यांचा ओढा वाढत आहे. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रात कॉम्प्युटर सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स विद्याशाखांमध्ये सुमारे एक हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्याशाखांमधील नवीन तुकडी सुरु करण्याबाबत राज्य शासनाने मान्यता देण्याचा घेतलेला निर्णय विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरणारा आहे.
>
> - डॉ. आर. के. कामत, विभागप्रमुख, इलेक्ट्रॉनिक्स आणि कॉम्प्युटर सायन्स, शिवाजी विद्यापीठ



### नवीन तुकड्यांची संख्या

- कॉम्प्युटर सायन्स : ६
- क्रॉप सायन्स : ३
- इलेक्ट्रॉनिक्स : ४

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2017
Times of India

# SUK begins to announce results

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has begun announcing the results for winter examination which was held from October 4. According to the university officials, around 28 results have been announced till Saturday.

The university officials told TOI that more than 600 exams for various streams were conducted in October and the results are likely to be announced in a step-by-step process in coming days.

Mahesh Kakade, director of Board of Examinations and Evaluation SUK, said, "The results, which have been announced, include under-graduate as well as the post-graduate courses and the assessment is going on at 17 CAP centres across the division."

The work for drawing results is still on and is likely to be completed by January. The exam department has completed almost 75% of evaluation of the engineering courses

## PROCESS TO BE COMPLETED BY JAN

and results will be announced soon, he added.

Explaining the assessment process, Kakade said, "We have continued with the last semesters' assessment pattern through de-centralization of Central Assessment Program. Each district has its CAP centres which helped the evaluators save a lot of time."

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2017
सकाळ

# पर्यावरणशास्त्रात अभ्यासाबरोबर कृतीही महत्त्वाची : डॉ. राऊत

## नाईट कॉलेजमध्ये एकदिवसीय पर्यावरण कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

इचलकरंजी, ता. १० : पर्यावरणशास्त्र हा केवळ अभ्यासाचा विषय नसून यात कृतीही महत्त्वाची आहे, असे मत डॉ. पी. डी. राऊत यांनी केले. येथील खंजिरे शिक्षण संस्थेच्या नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्समध्ये अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत आयोजित पर्यावरण अभ्यास क्षेत्रातील संशोधन क्षेत्र या विषयावरील आयोजित एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. प्राचार्य डॉ. पुरंदर नारे अध्यस्थानी होते.

डॉ. राऊत म्हणाले, ''पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने प्रत्येकाने आपला परिसर स्वच्छ ठेवण्यास प्रारंभ केल्यास बराच फरक पडेल. अलीकडे



महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा पर्यावरण अभ्यासाकडे ओढा वाढत असून त्याबाबत पुरेशी जाणीवही निर्माण झाली आहे. ही जाणीव अधिक दृढ व्हावी म्हणूनच महाविद्यालयीन स्तरावर पर्यावरण अभ्यास सक्तीचा करण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला. तरुणांनी कृती व प्रबोधनाच्या पातळीवर अधिक प्रमाणात पुढे आले पाहिजे.''

निलावणी वडर, सायली पाटील, ऐश्वर्या यादव, वैभव लोकरे या विद्यार्थ्यांनी कार्यशाळेचा विषय महत्त्वाचा असून तज्ज्ञांकडून झालेले मार्गदर्शन लाभदायी ठरल्याचे मनोगतामध्ये स्पष्ट केले. प्राचार्य डॉ. नारे यांनी कार्यशाळेचा विषय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या अभ्यासाच्या तसेच सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा असल्याने तज्ज्ञांकरवी झालेल्या मार्गदर्शनाचा व्यापक प्रसार करण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले.

संयोजक प्रा. विरुपाक्ष खानाज यांनी प्रास्ताविक केले. स्वागत भूगोल विभाग प्रमुख प्रा. आर. ए. कोरे यांनी केले. प्रा. एम. आर. दांडेकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जी. बी. खांडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 DEC 2017
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा जानेवारीत दीक्षांत समारंभ?

प्रतिनिधी
कोल्हापूर



- ३५ हजार विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष तर २५ हजार विद्यार्थ्यांना घरपोच पदवी प्रमाणपत्र
- पदवी प्रमाणपत्र छापण्याचे काम युध्द पातळीवर सुरू

शिवाजी विद्यापीठाचा ५३ वा दीक्षांत समारंभ जानेवारी २०१८च्या तिसऱ्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. या दीक्षांत समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लोकसभेच्या अध्यक्षा सुमित्रा महाजन, मनुष्यबळ विकास मंत्री प्रकाश जावडेकर, इस्रोचे अध्यक्ष ए. एस. किरणकुमार यांच्या उपस्थितीसाठी विद्यापीठाकडून प्रयत्न सुरू आहेत. अशी माहिती विद्यापीठाच्या अधिकृत सुत्रांनी दिली.

शिवाजी विद्यापीठातर्फे यंदा जवळपास ३५ हजार विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष तर २५ हजार विद्यार्थ्यांना घरपोच पदवी प्रमाणपत्र दिले जाणार आहे. तसेच पीएच.डी. पदवी पैकी फॅकल्टी ऑफ आर्ट ॲन्ड फायनल आर्ट, सोशल सायन्स, विज्ञान विभाग, कॉमर्स विभाग, शिक्षणशास्त्र विभाग, अभियांत्रिकी आदी विभागातील विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र व्यासपीठावर दिली जाणार आहेत. परीक्षा व मूल्यमापन समितीचे संचालक महेश काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा विभागात कामाची लगबग सुरू आहे. अर्जांची तपासणी चेकलिस्ट तयार करणे, पदवी प्रमाणपत्र छापण्याचे काम युध्द पातळीवर सुरू आहे. रविवारीसुध्दा परीक्षा विभागातील दिली आहे. स्नातकांना दीक्षांत समारंभाची सविस्तर माहिती ईमेल व एसएमएसव्दारे दिली जाणार आहे. प्रमुख पाहुण्यांची तारीख न मिळाल्यास दीक्षांत समारंभ फेब्रुवारीमध्ये हाईल, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

11 DEC 2017
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालय इस्लामपूर अजिंक्य

## शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी स्पर्धा ; विजयसिंह यादव महाविद्यालय उपविजेते

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी स्पर्धेमध्ये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र इस्लामपूर संघाने विजेतेपद पटकाविले. विजयी संघाला नगरसेवक संतोष गायकवाड, विजय साळोखे-सरदार, नझीर मुल्ला, अनिल परांडेकर, जगमोहन भुर्के यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.



कोल्हापुरातील मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम येथे रविवारी झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय हॉकी स्पर्धेतील विजेत्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र इस्लामपूर संघाला बक्षीस प्रदान करताना नगरसेवक संतोष गायकवाड, विजय साळोखे-सरदार, नझीर मुल्ला, अनिल परांडेकर, जगमोहन भुर्के आदी उपस्थित होते.

रविवारी झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात यशवंतराव चव्हाण महाविद्यालय इस्लामपूर वि. विवेकानंद कॉलेज संघ यांच्यामध्ये झाला. इस्लामपूरने २ - ० अशा गोलफरकाने विजय मिळवीत अंतिम फेरीत प्रवेश केला. सचिन भोसले, विवेक पाटील यांनी गोल केले.

दुसऱ्या उपांत्य सामन्यात विजयसिंह यादव वडगाव संघाने संजीवन इंजिनिअरिंग कॉलेज, पन्हाळा संघावर ३ वि. ० गोलफरकाने विजय मिळवीत अंतिम फेरीत प्रवेश केला. यामध्ये रोहन पोवार, सौरभ सुतार, आकाश उंडाळे यांनी गोल केले.

तिसऱ्या क्रमांकासाठी झालेल्या सामन्यात विवेकानंद कॉलेजने संजीवन इंजिनिअरिंग कॉलेजवर ३-० अशा गोलफरकाने मात करीत तिसरा क्रमांक पटकाविला. यामध्ये इस्लामपूर संघाकडून सचिन भोसलेने दोन गोल केले; तर पेठवडगाव संघाकडून रोहन पवारने एक गोल केला.

अंतिम सामना यशवंतराव चव्हाण इस्लामपूर वि. विजयसिंह यादव पेठवडगाव यांच्यामध्ये झाला. यामध्ये इस्लामपूर संघाने २ विरुद्ध १ अशा गोलफरकाने विजय मिळविला. इस्लामपूर संघाकडून सचिन भोसलेने दोन गोल केले; तर पेठवडगाव संघाकडून रोहन पवारने एक गोल केला.

स्पर्धेसाठी पंच म्हणून सचिन धुमाळ, शिवाजी डुबल, योगेश देशपांडे, संतोष चौगुले, सागर जाधव, सागर पोवाळकर, गणेश पोवार, आदींनी काम पाहिले. टेबल पंच म्हणून रामचंद्र पाटील यांनी काम पाहिले. स्पर्धेचे संयोजन संजीवन इंजिनिअरिंग कॉलेज, पन्हाळा यांनी केले होते.